E Drive/Jahir Pragatan 2027-2028


**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Chhatrapati Sambhajinagar – 431 004, Maharashtra, India
NAAC Re-Accredited 'A+' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/ 119/ 115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)


## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९ (४) (क) व शासन निर्णय क्र.एनजीसी २०२५/ई-१३१९८७८/मशि-४, दि.१८ सप्टेंबर, २०२५ नुसार पात्र संस्था / महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ करीता विस्तारीकरणाअंतर्गत नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरु करण्याकरीता पात्र महाविद्यालयांकडुन **दिनांक ३० सप्टेंबर, २०२६** पर्यंत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सादर करावयाचे विहित नमुन्यातील प्रस्ताव/आवेदनपत्र, शासन निर्णय परिशिष्टांसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http://www.bamu.ac.in या संकेतस्थळावर Online Affiliation हया लिंक मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व प्रस्ताव [New College Permission System (NCPS] या ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार आहेत.

प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९ (१) (२) (३) नुसार नवीन महाविद्यालय करीताचा शासन निर्णयातील अटी व शर्ती यांची पुर्तता करणाऱ्या पात्र संस्था / महाविद्यालयांनीच प्रस्तुत प्रकरणी प्रस्ताव सादर करावेत.

१) शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करीता विस्तारीकरणांतर्गत अभ्यास पाठयक्रम / विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी शासनाने नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली [New College Permission System (NCPS] ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली असून http://htedu.maharashtra.gov.in/NCPS/ या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. तसेच विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. विस्तारीकरणांतर्गत अभ्यास पाठयक्रम / विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी याबाबत ऑनलाईन शुल्क भरणा करणे करीता online.bamu.ac.in/affiliation या लिंकवर Ord. १५०, १५१ व १५२ नुसार भरणा करुन शासनाने दिलेल्या लिंकवर माहिती भरतांना ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या शुल्काचा तपशील (जसे भरलेले शुल्क, UTR No. व दिनांक समाविष्ट करावा) भरावा.

२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९ (६) मधील तरतुदीनूसार नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरू करण्यासाठीचे विद्यमान महाविद्यालयांचे किंवा परिसंस्थांचे नॅक / एनबीए मानांकनानुसार मूल्यांकन किंवा पुनर्मूल्यांकन केलेले असणे आवश्यक आहे.

३) शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ अन्वये विहित केल्यानुसार विस्तारीकरणांतर्गत महाविद्यालय निहाय स्वतंत्रपणे वाढीव अभ्यासक्रमासाठी रुपये ५ लाख, वाढीव विषयासाठी रुपये २ लाख, वाढीव विद्याशाखेसाठी रुपये ५ लाख व वाढीव अतिरिक्त तुकडीसाठी रुपये ३ लाखचे मुदत ठेव / एफ.डी. राष्ट्रीयकृत बँकेचे प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

४) प्रस्तुत शासन निर्णयातील तरतुदींनुसार संबंधित महाविद्यालयांकडे अस्तित्वात असलेल्या अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, तुकड्यांसाठी शासनाने विहित केलेल्या निकषानुसार मुलभूत व भौतिक सुविधा इ. सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यास पाठयक्रम/विद्याशाखा/तुकडी यासाठी प्रस्ताव / आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी संबंधीतानी याबाबत खातरजमा करून घ्यावी..

५) तसेच नविन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, तुकड्यांसाठी प्रस्ताव सादर करताना शासनाने विहित केलेल्या निकषानुसार मुलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध असल्याबाबतचे प्रमाणित कागदपत्रे महाविद्यालयांनी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६) तसेच संबंधित महाविद्यालयांनी नियमित मान्यताप्राप्त प्राचार्यांची नियुक्ती, नियमित मान्यताप्राप्त अध्यापक यांची नियुक्ती केलेली असणे आवश्यक आहे.

७) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम (४) (क) व शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ अन्वये विहित केल्यानुसार व शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या महाविद्यालयांनीच सॅटेलाईट केंद्रासाठी परिशिष्ट 'अ' व 'ब' नुसार प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

८) ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावाची हार्डकॉपी दोन प्रतीमध्ये परिशिष्ट अ नुसार मुद्देनिहाय क्रमवार कागदपत्र जोडावीत. त्यास अनुक्रमणिका, अनु.क्र. द्यावा व पताका लावावेत. तसेच प्रस्तावासोबतच्या सर्व छायांकित पानांवर

साक्षांकन करून दि.०१/१०/२०२६ पर्यंत विद्यापीठास सादर करावेत. **तसेच प्रस्तावाची सॉफ्टकॉपी पेनड्राईव्हसह सादर करण्यात यावी.**

९) विद्यापीठ अध्यादेश-१५०, १५१ व १५२ अन्वये विहित केल्यानुसार सर्व संबंधित महाविद्यालयांनी विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. **सदरील शुल्क परत मिळणार नाही किंवा सदरील शुल्क ना परतावा असेल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

१०) **नवीन विधी महाविद्यालय तसेच विस्तारीकरणांतर्गत विधी महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांबाबत सोबत जोडलेल्या शासनाचे दि.२४.०८.२०२६ रोजीच्या पत्रानूसार कार्यवाही करण्यात यावी.**

११) **शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट,२०२६ अन्वये सन २०२७-२८ या शैक्षणिक वर्षापासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये नमूद कार्यपद्धतीनुसार 'समाजकार्य' अशी स्वतंत्र विद्याशाखा / नवीन अभ्यासक्रम / अतिरिक्त तुकडी तसेच, अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम / अतिरिक्त तुकडी कायम विना अनुदानित तत्वावर सुरू करण्यास मान्यता दिल्याने समाजकार्य करीताचे प्रस्ताव मागविण्यात येत आहे.**

१२) प्रस्तुत प्रकरणी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक सर्व संबंधितांना लागू राहतील.

करिता प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०९ (४) (क) व शासन निर्णय दि.१८ सप्टेंबर, २०२५ नुसार शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ करीता विस्तारीकरणाअंतर्गत नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरू करण्याकरीता उपरोक्त तरतुदींची परिपूर्तता करणाऱ्या पात्र महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव व विहित शुल्क भरून त्याची हार्डकॉपी सर्व पुरक कागदपत्रांसह ०२ प्रतिमध्ये दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत शैक्षणिक विभागात सादर करावेत. वरील प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीमध्ये ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**संदर्भ क्र.** शैक्ष/संलग्न/एबीएम/२०२६-२७/5067-74 ==*==
**दिनांक** ०८-०९-२०२६. ==*==
==*==

**कुलसचिव**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

या परिपत्रकाची प्रत माहितीस्तव तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव:-

१) कक्षाधिकारी, मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सादर.
२) मा.प्र-कुलगुरू महोदयांचे स्वीय सहायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सादर.
३) अध्यक्ष / सचिव / प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था यांना माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेषित.
४) मा. संचालक, युनिक विभाग यांना देउन कळविण्यात येते की, वरील परिपत्रकाप्रमाणे संबंधित महाविद्यालयांना विस्तारीकरणाअंतर्गत ऑनलाईन अर्ज व शुल्क सादर करण्यासाठीची माहिती विद्यापीठाच्या पोर्टलमध्ये उपलब्ध करून देण्यात यावी.
५) मा. वित्त व लेखाधिकारी, वित्त व लेखा विभाग, यांना एक प्रत देण्यात येऊन कळविण्यात येते की, वरील परिपत्रकाप्रमाणे संबंधित महाविद्यालयांना विस्तारीकरणाअंतर्गत ऑनलाईन शुल्क सादर करण्यासाठी बँक व युनिक यांचे समन्वयाने API व्दारे सदरील शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारणे बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.
६) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव.
७) जनसंपर्क अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

स्वा/-
**कुलसचिव**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार,
कक्ष क्रमांक ४१८, चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID: -mashi4-hted@mah.gov.in

**क्रमांक: नामांत-२०२५/ई-११७९६८४/मशि-४** **दिनांक:- स्वाक्षरीप्रमाणे**

**प्रति,**
**कुलगुरू,**
**सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठे.**

**विषय:-** शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ साठी नवीन विधी महाविद्यालयांचे प्रंस्तावांच्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१६ व शासन निर्णय दिनांक १८.०९.२०२५ मधील कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणेबाबत.

**संदर्भ:-** १. बार कौन्सिल ऑफ इंडियाची दिनांक १३.०८.२०२५ ची Rules of Legal Education – Moratorium (Three – Year Moratorium), २०२५ संदर्भातील Press Release.
२. बार कौन्सिल ऑफ इंडियाची दिनांक ०५.०३.२०२६ चा Withdrawal of the Rules of Legal Education - Moratorium (Three – Year Moratorium), २०२५ and Adoption of Inspection – based Famework निर्णय.
३. ॲड. सदाशिवराव पाटील, मा.वि.स.स. यांचे दिनांक १८.०८.२०२६ रोजीचे निवेदन.

विषयांकित प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, भारतीय विधिज्ञ परिषद, नवी दिल्ली यांनी दिनांक १३.०८.२०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे पुढील तीन वर्षात नवीन विधि महाविद्यालयांना मान्यता देण्यात येवू नये. अस्तित्वात असलेल्या विधि महाविद्यालयात विस्तारीकरणांतर्गत नवीन अभ्यासक्रम/नवीन अतिरिक्त तुकडी यांना पुढील तीन वर्षात कोणतीही मान्यता देवू नये, अशा सूचना दिल्या होत्या.

२. वरील पार्श्वभूमीवर, शासनपत्र दिनांक १९.०९.२०२५ अन्वये सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठांना खालीलप्रमाणे कळविण्यात आले:

पुढील ३ वर्षे नवीन विधी महाविद्यालयांना परवानगी देण्यात येऊ नये या बार कॉन्सील ऑफ इंडिया यांच्या दि. १३.०८.२०२५ कौन्सिल ऑफ इंडियाचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) सादर करणा-या संस्थांचेच प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ च्या कलम १०९(३) (ग) नुसार स्वीकारण्यात यावेत. विद्यापीठाने सदर बाब जाहिरात देताना नमूद करावी.

त्याचप्रमाणे अन्य शासन पत्र दिनांक १९.०९.२०२५ अन्वये विस्तारीकरणांतर्गत "विधी" अभ्यासक्रमासंदर्भातील नवीन अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/नवीन तुकडी या संदर्भातील प्रस्तावाबाबत केवळ बार काउन्सिल ऑफ इंडियाचे ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र सादर करणाऱ्या संस्थांचे/महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, २०१६ च्या कलम १०९ (४) (ग) नुसार स्वीकारण्यात यावेत. विद्यापीठाने सदर बाब जाहिरातीत नमूद करावी, असे सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठांना कळविण्यात आले होते.

३. उपरोक्तप्रमाणे सूचना निर्गमित केल्यानंतर नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली (New College Permission System-NCPS) नवीन विधी महाविद्यालयांच्या प्रस्तावासंदर्भात बार काउन्सिल ऑफ इंडियाचे ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र अपलोड करण्याकरिता टॅब उपलब्ध करून देण्यात आला. सबब, ज्या संस्थांकडे बार काउन्सिल ऑफ इंडियाचे ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र आहे, केवळ अशाच संस्था नवीन विधी महाविद्यालयाकरिता अर्ज करू शकत होत्या.

४. आता, भारतीय विधिज्ञ परिषदेने दिनांक ०५.०३.२०२६ रोजीच्या नोटीफीकेशनद्वारे सदर ३ वर्षाचा मोराटोरिअमचा कालावधी रद्द केलेला आहे. सबब, शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करीता नवीन विधी महाविद्यालय तसेच विस्तारीकरणांतर्गत विधि महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांबाबत महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम, २०१६ तरतूदी व शासन निर्णय दिनांक १८.०९.२०२५ मधील कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Jayshree Jaideep Pawar
Date: 24-08-2026
16:02:33

**(जयश्री पवार)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. निवडनस्ती (मशि-४)